दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | सोमवार , 19 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 156 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज संबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# नवी मुंबईत 16 तास पाणीपुरवठा बंद, कोणकोणत्या परिसराला फटका बसणार?

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत्या मंगळवारी पाणीपुरवठा विषयक कामे हाती घेण्यात येणार असल्यामुळे 16 तासांसाठी पाणी पुरवठा बंद राहणार

**नवी मुंबईः वृत्तसंस्था**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत्या मंगळवारी पाणीपुरवठा विषयक कामे हाती घेण्यात येणार असल्यामुळे पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. भोकरपाडा आणि मोरबे मुख्य जलवाहिनीवर महत्त्वाचे काम हाती घेतल्यामुळे पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. मंगळवारी तब्बल 16 तासांसाठी नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. याचा फटका नवी मुंबई आणि पनवेल परिसरामधील रहिवाशांना बसणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेने नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याचा सल्ला दिला आहे.

नवी मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी 6 ऑक्टोबर रोजी सकाळी 10 वाजेपासून ते बुधवारी मध्यरात्री 2 वाजेपर्यंत महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा विषयक कामे हाती घेण्यात येणार आहेत. भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातील 13.5 दशलक्ष लिटर क्षमतेच्या पंपाच्या चॅनेल व्हॉल्व्हसाठी एम.एस. प्लेट बसविण्याचे काम केले जाणार आहे. भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रामध्ये नवीन मीटरिंग किऑस्क बसविण्याचे काम केले जाणार आहे. भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्राजवळील 2000 मि.मी. व्यासाच्या मोरबे मुख्य जलवाहिनीवर फ्लो मीटर बसविण्याचे काम केले जाणार आहे.

शिवाय, बेलापूर सी.बी.डी. सेक्टर-9 मध्ये मोरबे मुख्य जलवाहिनीवर 1200 मि.मी. व्यासाचा बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसवण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. वाशी येथील अरेंजा सर्कलजवळ मोरबे मुख्य जलवाहिनीला जोडलेल्या वितरण जलवाहिनीवर 900 मि.मी. व्यासाचा बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसवण्याचे काम केले जाणार आहे. महापे येथे मोरबे मुख्य जलवाहिनीला जोडलेल्या वितरण जलवाहिनीवर



800 मि.मी. व्यासाचा बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविण्याचे काम केले जाणार आहे. या कामामुळे नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रामध्ये 6 ऑक्टोबर आणि 7 ऑक्टोबर रोजी 16 तासांसाठी मुख्य जलवाहिनीवरील पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या बंदचा फटका बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे- सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली विभागांवर होणार आहे. शिवाय, सिडकोच्या खारघर आणि कामोठे नोडमधील पाणीपुरवठाही बंद राहणार आहे. दरम्यान, बुधवारी 7 ऑक्टोबर रोजी पाणीपुरवठा पूर्ववत केल्यानंतर जलवाहिनीतील प्रवाह सुरळीत होण्यासाठी काही वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुधवारी सकाळचा आणि सायंकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा बंदच्या कालावधीचा विचार करून आवश्यक पाणीसाठा करून ठेवावा आणि उपलब्ध पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

# विश्वनाथ फाउंडेशनतर्फे अधिवक्ता विनीत विनोद जैन यांचा विशेष सन्मान ; उल्लेखनीय कार्याचा गौरव

**मुंबई प्रतिनिधी**

समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या विश्वनाथ फाउंडेशनच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता विनीत विनोद जैन यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विश्वनाथ फाउंडेशनचे सचिव तथा मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड. शंकर चव्हाण यांनी मुंबई येथील ॲड. जैन यांच्या कार्यालयाला भेट देऊन त्यांना 'विशेष उल्लेखनीय कार्याचा गौरव' हे सन्मानपत्र प्रदान केले. या भेटीदरम्यान उच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड. किरण भालेराव, ॲड. ब्रिजेश शुक्ला, सुकांता करमकर तसेच इंटर्न दीपक दासूद उपस्थित होते.

विश्वनाथ फाउंडेशनच्या वतीने आयोजित या सन्मान उपक्रमातून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे आणि इतरांनाही प्रेरणा मिळावी, हा अशा उपक्रमांमागील प्रमुख उद्देश आहे. याच भावनेतून अधिवक्ता विनीत विनोद जैन यांचा सन्मान करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयात अधिवक्ता म्हणून कार्यरत असलेले ॲड. विनीत विनोद जैन यांना सन्मानपत्र प्रदान करताना ॲड. शंकर चव्हाण यांनी त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली. सन्मानपत्रामध्ये त्यांच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत. अशा सन्मानांमुळे संबंधित व्यक्तींच्या कार्याला प्रोत्साहन मिळण्याबरोबरच इतरांनाही आपल्या क्षेत्रात अधिक जबाबदारीने आणि समर्पित भावनेने काम करण्याची प्रेरणा मिळते.



या प्रसंगी उपस्थित अधिवक्त्यांनीही या सन्मान उपक्रमात सहभाग घेतला. न्यायव्यवस्थेत कार्यरत असलेल्या व्यक्तींमध्ये परस्पर संवाद, सहकार्य आणि व्यावसायिक संबंध दृढ होण्यासाठी अशा भेटी महत्त्वाच्या ठरतात. मुंबई उच्च न्यायालयाशी संबंधित अधिवक्त्यांची या प्रसंगी उपस्थिती असल्याने हा कार्यक्रम व्यावसायिक आणि स्नेहपूर्ण वातावरणात पार पडला.

विश्वनाथ फाउंडेशनच्या कार्याचा विचार करता, समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करणे ही सामाजिक प्रोत्साहनाची एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. पुरस्कार किंवा सन्मानपत्र हे केवळ औपचारिक गौरवाचे प्रतीक नसून, संबंधित व्यक्तीच्या कार्याची दखल घेतली जात असल्याचा संदेश देणारे माध्यम आहे. त्यामुळे अशा उपक्रमांतून समाजात सकारात्मक कार्यसंस्कृती निर्माण होण्यास मदत होऊ शकते.

ॲड. शंकर चव्हाण यांनी फाउंडेशनच्या सचिवपदाच्या माध्यमातून ॲड. जैन यांच्या कार्यालयाला भेट देऊन प्रत्यक्ष सन्मान केल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सन्मानपत्र प्रदान करताना उपस्थित मान्यवरांनीही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात ॲड. किरण भालेराव, ॲड. ब्रिजेश शुक्ला, सुकांता करमकर आणि इंटर्न दीपक दासूद यांची उपस्थिती होती.

आजच्या काळात व्यावसायिक यशासोबतच समाजासाठी सकारात्मक योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे आवश्यक आहे. अशा व्यक्तींच्या कार्याची दखल घेतल्यामुळे नव्या पिढीतील विद्यार्थी, इंटर्न आणि व्यावसायिकांनाही प्रेरणा मिळू शकते. विशेषतः कायद्याच्या क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या तरुणांना अनुभवी अधिवक्त्यांच्या कार्याचा परिचय होणे आणि त्यांच्या व्यावसायिक वाटचालीतून प्रेरणा घेणे महत्त्वाचे ठरते.

विश्वनाथ फाउंडेशनच्या वतीने ॲड. विनीत विनोद जैन यांचा करण्यात आलेला हा सन्मान उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्याच्या उपक्रमातील एक महत्त्वाचा भाग ठरला. या निमित्ताने फाउंडेशनने कार्याचा सन्मान, सकारात्मक योगदानाला प्रोत्साहन आणि परस्पर सहकार्याचा संदेश दिला.

# दसऱ्याला धनंजय मुंडे भगवानगड आणि भगवान भक्तीगड दोन्हीकडे राहणार उपस्थित

### विचारांचे सोने लुटण्यासाठी मी येतोय, तुम्हीही या : धनंजय मुंडेंचे आवाहन

## भगवानगडावर सकाळी दर्शन तर दुपारी सावरगाव येथील पंकजाताई मुंडेंच्या दसरा मेळाव्यात राहणार उपस्थित

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रेम, आपुलकी आणि विचारांचे सोने लुटण्यासाठी तसेच ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या दर्शनासाठी दसऱ्याच्या दिवशी सकाळी मी श्री क्षेत्र भगवानगड येथे येत असून त्यानंतर पंकजाताई मुंडे यांच्या वतीने आयोजित सावरगाव येथील भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्यासहीउपस्थित राहणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्टद्वारे सांगितले आहे.



श्रीक्षेत्र भगवानगड येथे सकाळी लवकर पोहचून धनंजय मुंडे हे ऐश्वर्य संपन्न संत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पारंपरिक सीमोल्लंघन सोहळ्यास उपस्थित राहून गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचेही दर्शन घेतील.

त्यांनंतर पाटोदा तालुक्यातील सावरगाव येथे ना. पंकजाताई मुंडे यांनी भगवान भक्तीगड येथे आयोजित केलेल्या दसरा मेळाव्यास देखील ते उपस्थित राहणार असून, या मेळाव्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# पदवीधर मतदारसंघातील मतदारांना मतदानासाठी विशेष नैमित्तिक रजा

**छत्रपती संभाजीनगर :**

भारत निवडणूक आयोगाने छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या मतदानासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर केली आहे. तसेच मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या १६ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या सुधारित पत्रानुसार, खासगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना मतदानासाठी दोन ऐवजी चार तासांची विशेष सवलत देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत,अशी माहिती विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांनी दिली आहे. या निवडणुकीत मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५ ब नुसार ही भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही विशेष रजा अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियमित अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असेल. ही रजा केवळ संबंधित मतदारसंघातील मतदार असलेल्या शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाच लागू असणार आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी सर्व शासकीय कार्यालयांचे दैनंदिन कामकाज सुरळीत सुरू राहील, याची दक्षता कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.







## ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते परळीच्या विविध भागात दुर्गोत्सव मंडळातर्फे आरती ; भक्तांची मोठी गर्दी अन् प्रचंड उत्साह

**परळी प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज नवरात्रोत्सव निमित्त शहराच्या विविध भागात दुर्गोत्सव मंडळाच्या वतीने देवीची आरती करण्यात आली. भक्तांचा मोठा उत्साह आणि गर्दी यावेळी उसळली होती.

शहरातील सुभाष चौक, सिध्दार्थ नगर, शिवाजीनगर भागात तुळजाभवानी, शिवाजीनगर दुर्गोत्सव, छत्रपती शिवाजीनगर, विद्यानगर दुर्गोत्सव, तेली समाज दांडिया उत्सव शनिमंदिर आदी विविध ठिकाणी ना. पंकजाताई मुंडे यांच्या आरत्या करण्यात आल्या. सर्व प्रभागात त्यांची नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

# संपादकीय

## लढाईपूर्वीच महाविकास आघाडीची हार?

सांगली–सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीने पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणात नव्या चर्चा सुरु आहेत. भाजपने धैर्यशील कदम यांना उमेदवारी जाहीर करत आघाडी घेतल्यानंतर महाविकास आघाडीसमोर सक्षम उमेदवार निवडीचे आव्हान उभे राहिले. अखेर बाळासाहेब पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा झाली असली, तरी या निर्णयामुळे राजकीय समीकरणांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

सांगली –सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी घेऊन आली आहे. भाजपने साताऱ्याचे माजी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर महाविकास आघाडीसमोर सक्षम आणि प्रभावी उमेदवार उभा करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. अखेरीस राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून ईश्वरपूरचे बाळासाहेब पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना आणि तर्कवितर्कांना उधाण आले आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, ही निवडणूक केवळ विधानपरिषदेच्या एका जागेपुरती मर्यादित नसून पश्चिम महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांची, पक्षीय ताकदीची आणि आगामी राजकीय घडामोडींची महत्त्वाची चाचणी ठरणार आहे.

एकेकाळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जाणारा सांगली-सातारा पट्टा गेल्या काही वर्षांत भाजपसाठी अधिक अनुकूल होत गेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपने मजबूत संघटन उभारले असून अनेक नगरपरिषद, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांमध्ये आपला प्रभाव वाढवला आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपने संघटनात्मक अनुभव आणि स्थानिक पातळीवरील मजबूत पकड असलेल्या धैर्यशील कदम यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी दिली. कदम यांच्या उमेदवारीची घोषणा होताच महाविकास आघाडीकडून कोणता उमेदवार मैदानात उतरणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली होती. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे तसेच जयंत पाटील यांचे पुत्र यांची नावे संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत होती. मात्र, या प्रमुख नेत्यांपैकी कोणालाही उमेदवारी मिळाली नाही किंवा त्यांनी स्वतः निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली नाही. त्यामुळे महाविकास आघाडीच्या रणनीतीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून, या घडामोडीकडे राजकीय निरीक्षक महत्त्वाचा राजकीय संदेश म्हणून पाहत आहेत.

महाविकास आघाडीने ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याकडे सोपवली होती. राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकांसाठी झालेल्या जागावाटपात राष्ट्रवादीला तुलनेने कमी जागा मिळाल्या असून, त्यामध्ये सांगली–सातारा मतदारसंघाला विशेष महत्त्व दिले जात होते. अशा परिस्थितीत पक्षाने आक्रमक आणि सर्वमान्य चेहऱ्याऐवजी दुसरा पर्याय निवडल्याने हा निर्णय पक्षाची रणनीती होती की राजकीय मजबुरी, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच विविध नावांची चर्चा सुरू होती. सातारा जिल्ह्यातील काही माजी मंत्र्यांमध्ये उमेदवारीसाठी चुरस असल्याच्या बातम्याही समोर आल्या होत्या. मात्र अखेरीस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे विश्वासू मानले जाणारे बाळासाहेब पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

त्यामुळे हा निर्णय राजकीय वजनापेक्षा संघटनात्मक निष्ठेला प्राधान्य देणारा असल्याची चर्चा राजकीय क्षेत्रात सुरू आहे. दुसरीकडे, भाजप आणि महायुतीने या निवडणुकीकडे प्रतिष्ठेची लढत म्हणून पाहण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बदललेले राजकीय समीकरण, ग्रामीण भागातील वाढलेला प्रभाव आणि विरोधी पक्षांतील अंतर्गत मतभेद यामुळे भाजप अधिक आत्मविश्वासात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीसमोर केवळ सक्षम उमेदवार उभा करण्याचेच नव्हे, तर मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि लढाऊ वातावरण निर्माण करण्याचेही मोठे आव्हान उभे राहिले आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, निवडणुकीचा निकाल काहीही लागला तरी उमेदवारी प्रक्रियेतून एक बाब स्पष्ट झाली आहे. सांगली–सातारा पट्ट्यात विरोधी पक्षांकडे मोठे आणि प्रभावी नेते असतानाही त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची तयारी दिसून आली नाही. परिणामी, भाजपच्या उमेदवाराविरोधात तुल्यबळ राजकीय चेहरा उभा राहू शकला नसल्याची भावना मतदारांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेकांच्या मते, निवडणुकीची खरी लढत सुरू होण्यापूर्वीच महाविकास आघाडी बचावात्मक भूमिकेत गेल्याचे चित्र दिसून येत आहे. आता ही धारणा प्रत्यक्ष मतदानाच्या रणांगणात कितपत खरी ठरते, याकडे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## 'निपुण सेतू'द्वारे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचूनही अंतिम निवड यादीत स्थान मिळवू न शकलेल्या गुणवंत उमेदवारांसाठी आयोगाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. अशा उमेदवारांना खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभागामार्फत 'मैत्री 2.0' पोर्टल अंतर्गत 'निपुण सेतू' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) 'प्रतिभा सेतू' या उपक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'निपुण सेतू' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत मजल मारलेल्या अनेक उमेदवारांकडे उच्च शैक्षणिक पात्रता, विश्लेषण क्षमता, नेतृत्वगुण आणि प्रशासकीय कौशल्ये असूनही मर्यादित पदसंख्येमुळे त्यांना संधी मिळत नाही.

## 40 किलो प्लास्टिक संकलनातून मँग्रोव्ह संवर्धनाला हातभार

**नवी मुंबई प्रतिनीधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून प्लास्टिकमुक्त नवी मुंबई संकल्पनेसाठी काम करणाऱ्या प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या व माईंडस्पेस रिटल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (REIT) यांच्या संयुक्त विद्यमाने ऐरोली येथील माईंडस्पेस बिझनेस पार्कमध्ये 'लीव्हज् अ मार्क' हा जनजागृतीपर अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या अंतर्गत नवी मुंबईतील खारफुटी (मँग्रोव्ह) परिसंस्थेचे महत्त्व आणि प्लास्टिक प्रदूषणामुळे होणाऱ्या घातक परिणामांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.

'नवी मुंबई प्लास्टिक आणि ई-वेस्ट रिसायक्लोथॉन' उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'लीव्हज् अ मार्क' या उपक्रमात 2400 हून अधिक नागरिक, कर्मचारी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. एका 32 फूट x 48 फूट आकाराच्या भव्य कॅनव्हासवर नागरिकांच्या पाऊलखुणांद्वारे मँग्रोव्ह परिसंस्थेचे चित्र साकारण्यात आले. हिरव्या आणि निळ्या रंगांच्या मानवी पाऊलखुणांनी मँग्रोव्हची झाडे व जलमार्गांचे प्रतिकात्मक लक्षवेधी चित्रण करण्यात आले.



या मोहिमेमध्ये 2,400 हून अधिक प्लास्टिकच्या बाटल्या आणि कंटेनर यांचे संकलन करण्यात आले. त्याचप्रमाणे साधारणतः 40 किलो प्लास्टिक कचरा पुनर्वापरासाठी वळविण्यात आला. उपलब्ध वैज्ञानिक अभ्यासांच्या आधारे या प्रयत्नामुळे ठाणे खाडी परिसरातील अंदाजे 280 मँग्रोव्ह वृक्षांवरील प्लास्टिकचा संभाव्य ताण कमी होण्यास मदत होणार आहे.संकलित प्लास्टिक हे प्रोजेक्ट मुंबई संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले असून त्यापासून महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी बाके तयार करण्यात येत आहेत. या उपक्रमात पर्यावरणपूरक आणि पुनर्वापरित साहित्याचाही वापर करण्यात आला.

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या उपक्रमाची प्रशंसा करीत नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागातून हा उपक्रम राबविला गेला असल्याने त्यामध्ये नागरिकांच्या पर्यावरण जागरुकतेचे प्रतिबिंब पडले असल्याचे सांगितले. नागरिक, प्रशासन आणि उद्योग क्षेत्र यांच्या एकत्रित सहभागातून पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.माईंडस्पेस REIT चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. रमेश नायर यांनी भौतिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधण्याच्या संस्थेच्या बांधिलकीवर भर दिला. प्रोजेक्ट मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक विश्वस्त श्री.शिशिर जोशी यांनी प्लास्टिक व्यवस्थापन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगत, या उपक्रमामुळे मँग्रोव्ह संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती झाल्याचे नमूद केले.आगामी काळात मँग्रोव्ह स्वच्छता मोहीम, पुनर्वापरित प्लास्टिकपासून सामुदायिक बाग उभारणी तसेच शाळा, महाविद्यालये आणि गृहनिर्माण संस्थांमध्ये पर्यावरणविषयक विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत.



## मनपाचा कर्मचारी स्वच्छता व पर्यावरणाचा ब्रँड ॲम्बेसेडर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोणत्याही चांगल्या गोष्टीचा प्रारंभ किती आत्मियतेने केला यावर त्याचे यश अवलंबून असते, त्यामुळे स्वत:पासूनच सुरुवात करायला हवी असे महापालिका अधिकारी, कर्मचारी यांना सांगत कचऱ्याचे निर्मितीच्या ठिकाणीच वर्गीकरण आणि प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर याला सर्वांनी प्राधान्य दयावे व 'प्लास्टिक मार्शल' म्हणून काम करावे असे मत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केले.

महानगरपालिकेचा प्रत्येक कर्मचारी हा ब्रँड ॲम्बेसेडर असल्याचे सांगत आयुक्त महोदयांनी शहर स्वच्छता व प्लास्टिक प्रतिबंधासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन काम करावे असे सूचित केले.जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात राबविण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमाप्रसंगी आयुक्त सुसंवाद साधत होते.पर्यावरण दिनानिमित्त मुख्यालय इमारतीत तळमजल्यावर दर्शनी भागात प्लास्टिक बॉटल क्रशर मशीन बसविण्यात आलेली आहे. या मशीनचा शुभारंभ महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ 1 उपआयुक्त सोमनाथ पोटरे, शिक्षण विभाग उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, क्रीडा विभाग उपआयुक्त अभिलाषा पाटील, वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे, मुख्य विधी अधिकारी अभय जाधव तसेच बायोक्रक्स संस्थेचे संचालक अजय मिश्रा व व्यवस्थापक व रौनक ठाकूर, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत पॅट्रो आणि इतर अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते. अटोस च्या सीएसआर निधीतून रोटरी क्लब व बायोक्रक्स या संस्थांच्या सहयोगाने ही प्लास्टिक बॉटल क्रशर मशीन नवी मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आली असून या मशीनमध्ये प्लास्टिक बॉटल टाकून त्यावरील की-पॅड वर आपला मोबाईल क्रमांक टाकायचा आहे. त्यानंतर आपल्या मोबाईल क्रमांकावर पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल अभिनंदन करीत दोन पॉईंटस मिळणार आहेत. हे पॉईंट्स संकलित करुन ठराविक पॉईंटस संकलित झाल्यानंतर स्मार्ट बझारव्दारे उपयोगी वस्तू मोफत मिळणार आहेत. अशा 12 मशीन्स महापालिका रूग्णालये, मार्केटसारख्या वर्दळीच्या जागा येथे बसविण्यात येणार आहेत. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत शाळांमध्ये वृक्षारोपांची नर्सरी तयार करण्यात येणार असून 'सीड बँक' हा अनोखा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. या माध्यमातून शहराचे भविष्य असलेल्या नव्या पिढीच्या मनात पर्यावरणाची जाणीव जागृती करुन शहराचे भविष्य पर्यावरणशील करण्यावर भर देण्यात येत आहे. अशाच प्रकारचा उपक्रम शहर पातळीवरही मोठया प्रमाणात राबवण्याचे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले. याप्रसंगी माझी वसुंधरा अभियानाची आयुक्तांसमवेत सामुहिक शपथ घेण्यात आली.

## ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम होईल

**मुंबई प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड माँ के नाम' या अभियानातून देशभरात वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी राहिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील राज्यव्यापी ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात केंद्रीय कर्मचारी निवासस्थान संकुलाचे भूमिपूजन, पर्यावरण जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष प्रचार वाहनाचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात वन कर्मचाऱ्यांना जंगलात स्वसंरक्षणासाठी उपयुक्त असलेल्या किटचे वाटप प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आले. यावेळी गृह स्वयं पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय उपाध्याय, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार मनीषा चौधरी, प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश दरेकर, गणेश शंकर, सरिता झोरे, अंकिता सावे, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ) के. प्रदीपा, एन.आर. प्रवीण, वन विभागाच्या उपसचिव निकिता पांडे तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालिका अनिता पाटील उपस्थित होत्या.यावेळी बोलताना वनमंत्री नाईक म्हणाले की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरण संरक्षणाची गरज सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आहे. पारंपरिक पेट्रोल आणि डिझेल इंधनांना पर्याय म्हणून सौर आणि पवन ऊर्जेसारख्या पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांवर भर देण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र वेगाने प्रगती करत असून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखण्याचे काम शासन करत आहे.संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांना जंगलातच खाद्य उपलब्ध व्हावे यासाठी जांभूळ, पेरू, फणस यांसारख्या फळझाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येणार आहे. त्यामुळे वन्यप्राणी अन्नाच्या शोधात जंगलाबाहेर येण्याचे प्रमाण कमी होईल. डोंगरवस्त्या आणि पाड्यांपर्यंत रस्ते सुविधा पोहोचविण्यासोबतच देवराई आणि वनराई निर्माण करण्यास प्राधान्य दिले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या विनंतीनुसार सामाजिक वनीकरण विभागामार्फत मुंबईसाठी एक लाख वृक्षरोपे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. वन कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा व आधुनिक साधने उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून वनविभागासाठी रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारण्याचाही विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील पाच विभागांमध्ये टिश्यू कल्चर केंद्रे सुरू झाली असून त्यातून मोठ्या प्रमाणात दर्जेदार रोपनिर्मिती केली जाणार आहे. २०४७ पर्यंत विकसित आणि सामर्थ्यवान भारत घडविण्यासाठी पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

आमदार मनीषा चौधरी यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या नावाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. 'प्लास्टिक हटाव, पर्यावरण बचाव' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.आमदार प्रकाश सुर्वे म्हणाले की, वाढत्या उष्णतेच्या लाटांमुळे पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पारसिक हिलवर वृक्षारोपण

**नवी मुंबई प्रतिनिधी**

सध्या वातावरणातील उष्णतेचे प्रमाण पाहता वसुंधरेची जपणूक केली नाही तर घातक परिणाम सोसावे लागतात हे दिसून येत असून प्रत्येक माणसाने एक झाड लावून ते जगवले तर काही प्रमाणात हा प्रश्न सुटण्यासाठी मदत होईल अशा शब्दात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी वृक्षारोपण व संवर्धनाचे महत्व विशद केले.



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका उद्यान विभागाच्या वतीने हार्टफुलनेस एन्स्टिट्यूट व अदानी रिॲलिटी या संस्थेच्या सहयोगाने पारसिक हिल येथे 200 हून अधिक देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी आयुक्त डॉ. कैलास शिंदे, उद्यान विभाग उपआयुक्त स्मिता काळे, परिमंडळ 1 उपआयुक्त सोमनाथ पोटरेआणि इतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## महाराष्ट्राला केंद्र शासनाचे तब्बल आठ पुरस्कार

मुंबई : प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेमध्ये गेल्या दोन वर्षांत केलेल्या कामगिरीसाठी केंद्र शासनाच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाकडून महाराष्ट्राचा गुरुवारी विविध वर्गवारीमध्ये तब्बल आठ पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. देशात इतर राज्यांच्या तुलनेत हे सर्वाधिक पुरस्कार आहेत. छतावरील सौर प्रकल्पांची संख्या, नागपूर, जळगाव, पुणे जिल्ह्यांची देशात आघाडी आणि 'मंथ ऑफ सोलर'मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्राचा हा सन्मान करण्यात आला.

नवी दिल्लीतील अटल अक्षय ऊर्जा भवनात आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांच्याहस्ते महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता दिलीप दोडके (नागपूर), अतिरिक्त



कार्यकारी अभियंता राहुल सोनटक्के यांनी हे पुरस्कार स्विकारले. यावेळी नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा सचिव संतोषकुमार सारंगी उपस्थित होते.येत्या मार्च २०२७ पर्यंत देशभरात १ कोटी घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याचे उद्दिष्ट ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात फेब्रुवारी २०२४ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. अवघ्या दोन वर्षांत देशातील ४० लाखांहून अधिक कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. महाराष्ट्र राज्यानेही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये मोठी आघाडी घेतली आहे.राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी पीएम सूर्यघर योजनेच्या अंमलबजावणीला मोठा वेग दिला आहे. त्यामुळे महावितरणने गेल्या दोन वर्षांत ६ लाख ५ हजार ८४७ घरांच्या छतावर सौर प्रकल्प कार्यान्वित असून देशात द्वितीय स्थान मिळवले आहे. तर गुजरातने ६ हजार ८१ हजार ४११ सौर प्रकल्पांसह प्रथम आणि उत्तर प्रदेशने ५ लाख ६४ हजार ८४६ सौर प्रकल्पांसह तिसरे स्थान प्राप्त केले आहे.यासोबतच देशपातळीवर १० टॉपर जिल्ह्यांमध्ये (कंसात छतावरील सौर प्रकल्पांची संख्या) नागपूर जिल्ह्याने (८९,२५५) देशात द्वितीय क्रमांक, जळगाव जिल्ह्याने (४२,५७४) नववा क्रमांक आणि पुणे जिल्ह्याने (४२,१५१) दहावा क्रमांक पटकावला आहे. पहिल्या दहा क्रमांकात महाराष्ट्राच्या सर्वाधिक या तीन जिल्ह्यांचा समावेश आहे हे विशेष. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाकडून मे २०२६ मध्ये 'मंथ ऑफ सोलर' ही मोहीम राबविण्यात आली. या विशेष मोहिमेदरम्यान महाराष्ट्रामध्ये तब्बल ६५ हजार ७८६ अर्ज प्राप्त झाले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)





# BDO संजय भिवा भोये यांच्या निवासस्थानी कुळपरंपरेचा जागर!

## आमदार हरिश्चंद्र भोये यांची उपस्थिती; श्रद्धा, संस्कृती आणि कौटुंबिक एकोप्याचा सुंदर संगम

**जव्हार (वा.)**

पालघर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (BDO) संजय भिवा भोये यांच्या निवासस्थानी भोये कुळ परिवाराचा पारंपरिक देवकार्याचा सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्याला विक्रमगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. हरिश्चंद्र भोये यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या निमित्ताने भोये कुळ परिवारातील सदस्य एकत्र आले आणि त्यांनी आपल्या कुळपरंपरेचा वारसा जपत श्रद्धा व संस्कृतीचे दर्शन घडविले.

कुळदेवतेच्या पूजेतून परंपरेचे जतन

भारतीय संस्कृतीमध्ये कुळदेवतेच्या पूजेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या धार्मिक परंपरा, रूढी आणि संस्कार यांचे जतन करण्यासाठी अशा देवकार्यांना विशेष महत्त्व असते. या सोहळ्याच्या माध्यमातून भोये परिवाराने आपल्या कुळदेवतेप्रती श्रद्धा व्यक्त करत पूर्वजांच्या परंपरेचे स्मरण केले.

आजच्या धावपळीच्या जीवनात कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अशा धार्मिक कार्यक्रमांतून घडते. कुटुंबातील ज्येष्ठांचे मार्गदर्शन, नव्या पिढीचा सहभाग आणि परस्परांतील स्नेहभाव यामुळे कौटुंबिक एकोपा अधिक दृढ होतो. भोये कुळ परिवाराच्या या देवकार्याने श्रद्धा, संस्कृती आणि कौटुंबिक ऐक्याचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

### ६६ कुटुंबांतील सदस्यांची उपस्थिती

या धार्मिक सोहळ्याला भोये परिवारातील जवळपास ६६ कुटुंबांतील सदस्य उपस्थित होते. यामध्ये महेश यशवंत भोये (सहायक महसूल अधिकारी, पालघर), केतन भोये (परीक्षण भूमापक, मुंबई), डॉ. कविराज भोये (एमबीबीएस, मुंबई), निवृत्त बाळकृष्ण भोये (अपर कोषागार अधिकारी, पालघर), यशवंत भोये सर, पांडुरंग भोये सर, चंदर भोये, जितेंद्र भोये, दामू भोये, अनंता भोये (माजी सभापती, जव्हार), बापू भोये, ज्येष्ठ समाजसेविका लक्ष्मी भोये, इंदू भोये, सुनील भोये, जयराम भोये, सुधीर भोये, अभिषेक भोये, महेश बबन भोये (सॉफ्टवेअर इंजिनिअर), विनायक भोये सर आदी मान्यवर व परिवारातील सदस्यांचा समावेश होता. या सोहळ्यामुळे भोये कुळ परिवारातील सदस्यांना एकत्र येण्याची, आपुलकीच्या संवादातून नातेसंबंध अधिक दृढ करण्याची आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळाली. कुळपरंपरा जपणे म्हणजे आपल्या संस्कृतीची मुळे अधिक घट्ट करणे. श्रद्धा, संस्कार आणि एकोप्याची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देणारा हा देवकार्याचा सोहळा भोये परिवारासाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

## लोकार्थ

### शेफिल्ड हॅलम युनिव्हर्सिटी व आयआयएसएम यांच्यात सामंजस्य करार

युनायटेड किंगडममधील 'शेफिल्ड हॅलम युनिव्हर्सिटी' आणि भारतातील 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स अँड मॅनेजमेंट' (आयआयएसएम) शुक्रवारी एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारामुळे दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक आणि संस्थात्मक सहकार्य अधिक घट्ट होण्यास मदत होईल.या करारामध्ये सहकार्यासाठी संयुक्त संशोधन आणि ज्ञान देवाणघेवाण, विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी देवाणघेवाणीच्या संधी आणि शैक्षणिक प्रगतीचे मार्ग तसेच संयुक्त शैक्षणिक उपक्रम शोधणे, या तीन प्रमुख क्षेत्रांची निवड करण्यात आली आहे: या कराराप्रसंगी साऊथ यॉर्कशायरचे महापौर ऑलिव्हर कोपार्ड, शेफिल्ड हॅलम युनिव्हर्सिटीच्या 'स्कूल ऑफ कॉम्प्युटिंग अँड डिजिटल टेक्नॉलॉजीज'चे प्रमुख धर्मेंद्र शदिजा आणि आयआयएसएमचे संस्थापक व संचालक निलेश कुलकर्णी उपस्थित होते.ही प्रस्तावित भागीदारी आयआयएसएमचे क्रीडा व्यवस्थापन आणि क्रीडा विज्ञानातील विशेष कौशल्य तसेच शेफिल्ड हॅलम युनिव्हर्सिटीची क्रीडा शिक्षण, उपयोजित संशोधन, क्रीडा अभियांत्रिकी, शारीरिक हालचाल आणि व्यापक क्रीडा उद्योगातील ताकद यांना एकत्र आणते. संशोधन संबंध, देवाणघेवाणीच्या संधी आणि शैक्षणिक प्रगतीचे मार्ग शोधण्याद्वारे, या संस्था भविष्यात सहकार्याची अधिक व्यावहारिक क्षेत्रे विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहेत.




### पीएफआरडीए आणि पीएचडीसीसीआयतर्फे एनपीएस जनजागृती,

पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण (पीएफआरडीए) ने, महाराष्ट्रातील पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (पीएचडीसीसीआय) च्या सहकार्याने, आयथिंक टॉवर, कांजूरमार्ग पूर्व, मुंबई येथे 'एनपीएस जनजागृती सत्र केले. या सत्रात नियोक्ते, कर्मचारी, एचआर, वित्त व्यावसायिक तसेच एमएसएमई व्यवसाय मालकांना राष्ट्रीय पेन्शन प्रणालीची (एनपीएस) वैशिष्ट्ये, फायदे, लवचिकता आणि नोंदणी प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार उपआयुक्त श्रीमती निलंबरी वसंतराव भोसले या प्रमुख पाहुण्या होत्या. त्या म्हणाल्या की, एनपीएस संघटित, असंघटित आणि कंत्राटी क्षेत्रातील कामगारांना सेवानिवृत्तीसाठी निधी उभारण्याचा एक शिस्तबद्ध, कमी खर्चाचा, हस्तांतरणीय आणि बाजारपेठेशी जोडलेला मार्ग उपलब्ध करून देते. त्यांनी नियोक्त्यांना त्यांच्या वार्षिक वेतनवाढ पॅकेज आणि प्लेसमेंट ऑफरमध्ये नियोक्त्याच्या एनपीएस योगदानाचा समावेश करण्याचे, तसेच त्यांच्या कंत्राटी आणि तात्पुरत्या कर्मचाऱ्यांना वगळू नये असे आवाहन केले.

### बीडी सॉफ्टचा महाराष्ट्रात सायबरसुरक्षा नेटवर्कचा विस्तार

भारतातील अग्रगण्य सायबरसुरक्षा वितरकांपैकी एक असलेल्या बीडी सॉफ्टवेअरने ५० हून अधिक नवीन चॅनल पार्टनर्सना सामील करून महाराष्ट्रात आपली उपस्थिती अधिक मजबूत करण्याची योजना आखली आहे. राज्यभरातील व्यवसाय क्लाउड प्लॅटफॉर्म, कनेक्टेड सिस्टीम आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा अवलंब वेगाने करत असल्याने हा विस्तार होत आहे, ज्यामुळे अधिक व्यापक आणि विशेष सायबरसुरक्षा क्षमतांची मागणी वाढत आहे. सुमारे ८७.४ लाख नोंदणीकृत एमएसएमईसह, जे भारतातील नोंदणीकृत एमएसएमईच्या १३.२% आहे, महाराष्ट्र सायबरसुरक्षा सोल्यूशन्ससाठी एक मोठी आणि वैविध्यपूर्ण बाजारपेठ सादर करतो.महाराष्ट्राच्या व्यावसायिक परिसंस्थेमध्ये वित्तीय सेवा, आयटी, ऑटोमोटिव्ह, उत्पादन, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स आणि मोठ्या प्रमाणात एसएमई/एमएसएमई क्षेत्रांचा समावेश आहे.कनेक्टेड इन्फ्रास्ट्रक्चर, संवेदनशील डेटा आणि डिजिटली सक्षम ऑपरेशन्सवरील अवलंबित्व लक्षात घेता, आयटी, मॅन्युफॅक्चरिंग आणि बीएफएसआयम ही बीडी सॉफ्टसाठी प्रमुख लक्ष केंद्रित क्षेत्रे राहतील.

### रोजगाराच्या संधीसाठी एकस्टेप फाउंडेशनचा एनएसडीसी सोबत सामंजस्य करार

नोकरी इच्छुक उमेदवार आणि उद्योगांना एकाच डिजिटल व्यासपीठावर आणून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ब्लू डॉट् एआय इकॉनॉमी' उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुंबई उपनगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येईल. या प्रकल्पासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि एकस्टेप फाउंडेशन यांच्यात बिगर-वित्तीय सामंजस्य करार करण्यात आला. तसेच राज्यातील कौशल्य विकास, रोजगारक्षमता आणि आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी विभागाने राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळासोबत (एनएसडीसी) सामंजस्य करार केला मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत हे करार झाले.'ब्लू डॉट् एआय इकॉनॉमी' उपक्रमातून जास्तीत जास्त उमेदवार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना जोडण्याचे उद्दिष्ट आहे. उमेदवारांची कौशल्ये आणि उद्योगांची मनुष्यबळविषयक गरज यांची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने सांगड घालून रोजगार प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात येणार आहे.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# सावधान ! पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत समाजमाध्यमांवरील प्रचारावर एमसीएमसीची नजर

## आक्षेपार्ह मजकूर, खोट्या बातम्या आणि अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन ; राजकीय जाहिरातींच्या पूर्वप्रमाणीकरण आवश्यक

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर विभागातील पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेत समाजमाध्यमांद्वारे प्रसारित होणारा प्रचारमजकूर, राजकीय जाहिराती आणि पेड न्यूजच्या संशयास्पद प्रकरणांवर माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्या (एमसीएमसी) माध्यमातून लक्ष ठेवण्यात येते. त्यामुळे उमेदवारांसह राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स, यूट्यूब, ब्लॉग तसेच व्हॉट्सॲपसारख्या समाजमाध्यमांवरून माहिती वेगाने प्रसारित होते. मात्र,एमसीएमसी समितीकडून परवानगी न घेता हे करू नये.

खातरजमा न केलेली माहिती, खोट्या बातम्या किंवा दिशाभूल करणारा मजकूर यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. धार्मिक अथवा जातीय तेढ निर्माण करणारा मजकूर, द्वेषपूर्ण संदेश, धमकीवजा पोस्ट आणि शांतता भंग होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या सामग्रीचे प्रसारण टाळणे आवश्यक आहे.

### उमेदवारांनी कोणती काळजी घ्यावी ?

- विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सहभागी उमेदवारांनी पुढील बाबींचे काटेकोर पालन करावे.

### राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण

- समाजमाध्यमांसह इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर राजकीय जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी लागू नियमांनुसार संबंधित एमसीएमसीकडून पूर्वप्रमाणीकरण करून घ्यावे.
- खात्रीशीर माहितीच प्रसारित करा.
- कोणतीही बातमी, छायाचित्र, व्हिडिओ अथवा संदेश पुढे पाठवण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी. खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करू नये.
- जातीय व धार्मिक तेढ टाळा: जात, धर्म, भाषा अथवा अन्य संवेदनशील मुद्द्यांच्या आधारे समाजात वैमनस्य निर्माण होईल, अशा स्वरूपाचा प्रचार करू नये.
- निवडणूक खर्चाची नोंद ठेवा: समाजमाध्यमांवरील जाहिराती, प्रचारासाठी तयार केलेला मजकूर, डिजिटल सामग्री आणि संबंधित सेवांवर झालेला लागू खर्च नियमानुसार निवडणूक खर्चात समाविष्ट करावा.
- मतदानापूर्वीच्या निर्बंधांचे पालन: मतदान समाप्त होण्यापूर्वीच्या ४८ तासांच्या प्रतिबंधित कालावधीत प्रचारासंबंधी लागू असलेल्या निर्बंधांचे काटेकोर पालन करावे.

### एमसीएमसीची कार्यपद्धती काय ?

- माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती ही निवडणूक प्रक्रियेत माध्यमांशी संबंधित नियमांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वाची यंत्रणा आहे. समितीची प्रमुख कामे पुढीलप्रमाणे आहेत.
- राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण : लागू नियमांनुसार इलेक्ट्रॉनिक माध्यमे, इंटरनेट संकेतस्थळे आणि समाजमाध्यमांवरील राजकीय जाहिरातींचे प्रकाशन किंवा प्रसारणापूर्वी प्रमाणिकरण करणे.
- माध्यमांचे संनियंत्रण : निवडणूक प्रचाराशी संबंधित प्रसिद्धीचे निरीक्षण करून लागू नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास निर्धारित प्रक्रियेनुसार कार्यवाहीसाठी अहवाल सादर करणे.
- पेड न्यूजवर लक्ष : मोबदल्याच्या बदल्यात बातमी किंवा विश्लेषण प्रसिद्ध झाल्याचा संशय असल्यास संबंधित प्रकरणाची छाननी करणे. आवश्यक पुरावे व नोंदींच्या आधारे पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण सादर करणे.
- निवडणूक खर्चाची नोंद : उमेदवारांच्या प्रचारजाहिरातींवरील खर्च आणि पेड न्यूज म्हणून निश्चित झालेल्या प्रकरणांतील लागू खर्चाची नोंद घेऊन संबंधित निवडणूक यंत्रणेला अहवाल सादर करणे.
- नियमभंगाच्या प्रकरणांचा पाठपुरावा : आचारसंहितेचा भंग, दिशाभूल करणारी माहिती किंवा इतर आक्षेपार्ह सामग्रीसंबंधी प्राप्त तक्रारींची निर्धारित प्रक्रियेनुसार छाननी करून संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठपुरावा करणे.

### नागरिकांनीही जबाबदारीने वागावे

- समाजमाध्यमांवरील प्रत्येक संदेश सत्य असेलच असे नाही. त्यामुळे अप्रमाणित बातम्या, जुनी छायाचित्रे नव्या घटनांच्या नावाखाली प्रसारित करणे, बनावट व्हिडिओ किंवा दिशाभूल करणारे संदेश पुढे पाठवणे टाळावे. व्हॉट्सॲप समूहांच्या प्रशासकांनीही समूहात प्रसारित होणाऱ्या आक्षेपार्ह किंवा दिशाभूल करणाऱ्या सामग्रीबाबत दक्ष राहावे. निवडणुकीच्या काळात केवळ समाजमाध्यमांवर मजकूर प्रसारित झाला म्हणून प्रत्येक प्रकरणात आपोआप गुन्हा दाखल होतो, असे नाही. संबंधित सामग्रीचे स्वरूप, लागू कायदे, आचारसंहितेतील तरतुदी आणि उपलब्ध पुरावे यांच्या आधारे सक्षम यंत्रणा निर्णय घेते. मात्र, कायद्याचे उल्लंघन आढळल्यास संबंधित नियमांनुसार कारवाई होऊ शकते. लोकशाही प्रक्रियेची विश्वासार्हता टिकविण्यासाठी उमेदवारांनी जबाबदार प्रचार करावा आणि नागरिकांनी माहितीची सत्यता तपासूनच ती प्रसारित करावी. समाजमाध्यमांचा सुजाण वापर, आचारसंहितेचे पालन आणि पारदर्शक प्रचार ही निष्पक्ष निवडणुकीची महत्त्वाची सूत्रे आहेत.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार, 19 ऑक्टोबर 2026

Last page

# आभा मुंडेची ऐतिहासिक कामगिरी!

## 18 व्या राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग स्पर्धेत तीन सुवर्णपदकांसह तीन राष्ट्रीय विक्रम; महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

दिव्यांगत्वावर मात करत, अदम्य जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर परळी वैजनाथ तालुक्यातील डाबी गावची सुवर्णकन्या आभा गणेश मुंडे हिने जलतरण क्षेत्रात सुवर्णमयी इतिहास रचला आहे. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या १८ व्या राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग स्पर्धा २०२६-२७ मध्ये तिने S8 वर्गात चमकदार कामगिरी करत तीन सुवर्णपदके पटकावली आणि तिन्ही स्पर्धा प्रकारांत राष्ट्रीय विक्रम मोडून नवा कीर्तीमान प्रस्थापित केला आहे. तिच्या या ऐतिहासिक यशाने संपूर्ण महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात आनand आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे.

### सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक आणि राष्ट्रीय विक्रमांची नोंद!

पॅरालिम्पिक स्विमिंग असोसिएशन महाराष्ट्राच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत आभाने आपल्या उत्कृष्ट तंत्राची आणि कौशल्याची चुणूक दाखवली: ५० मीटर बॅकस्ट्रोक: आभाने हा प्रकार ४८.३१ सेकंदांत पार करत स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक पटकावले आणि या प्रकारातील राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. ५० मीटर बटरफ्लाय: अत्यंत वेगवान आणि तांत्रिक दृष्ट्या कठीण असलेल्या या प्रकारात तिने ५१.४८ सेकंद वेळ नोंदवत दुसऱ्या सुवर्णपदकासह राष्ट्रीय विक्रमाला गवसणी घातली. २०० मीटर वैयक्तिक मेडले (Individual Medley): खेळाडूच्या सहनशक्तीची आणि कौशल्याची कसोटी पाहणाऱ्या या प्रकारात तिने ४ मिनिटे २२ सेकंद वेळ देत तिसरे सुवर्णपद मिळवून स्वतःचाच मागील ५ मिनिट ३ सेकंद चा विक्रम मेडून तिसऱ्या राष्ट्रीय विक्रमावर स्वतःचे नाव कोरले. आभा मुंडे हिचे हे यश केवळ काही पदकांपुरते मर्यादित नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ध्येय गाठण्याचे ते एक ज्वलंत उदाहरण आहे. तिचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे: कठोर परिश्रम व सराव: नियमित सराव, तासनतास घेतलेली मेहनत आणि प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे. इतरांसाठी प्रेरणा: तिच्या या यशामुळे क्रीडा विश्वात एक नवा अध्याय लिहिला गेला असून, अनेक नवोदित दिव्यांग खेळाडूंना आभाच्या रूपात पुढे जाण्याची मोठी प्रेरणा मिळाली आहे.





### क्रीडा क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव

**■ तीन सुवर्णपदके आणि तीन राष्ट्रीय विक्रमांची ही कामगिरी आभा मुंडे हिच्या क्रीडा प्रवासातील अत्यंत सुवर्णमयी टप्पा ठरली आहे. तिच्या या रुबाबदार यशाबद्दल क्रीडाप्रेमी, जलतरण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक वर्ग आणि परळीसह राज्यभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यात ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे आणि महाराष्ट्राचे नाव असेच उज्ज्वल करेल, अशी सदिच्छा सर्व स्तरातून व्यक्त केली जात आहे.**

---

# ना .पंकजाताई मुंडे डॉ . प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थिती होत असलेल्या दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहा : नगर परिषद बांधकाम सभापती प्रा . पवन मुंडे

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

भक्ती आणि शक्तीचा गड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावरगाव (ता. पाटोदा ) येथील भगवान भक्ती गडावर दसरा मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. मंत्री ना.पंकजाताई मुंडे व बीड जिल्हाच्या माजी खा डॉ .प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या दसरा मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

भगवान भक्तीगडावर होणारा दसरा मेळावा वंचितांचा शोषितांचा मेळावा म्हणून या दसरा मेळाव्याची ओळख आहे.राष्ट्रसंत भगवान बाबांची जन्मभूमी



असलेल्या पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर हा मेळावा दरवर्षी होत असतो.यंदाचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी असणार आहे.

या दसरा मेळाव्यात ना. पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी राज्यभरातून भगवान बाबांचे भक्त आणि मुंडे समर्थक लाखोंच्या संख्येने भगवान भक्ती गडावर दाखल होत असतात.

सावरगाव घाट येथे पाण्यावर ज्ञानेश्वरी वाचत असलेली राष्ट्रसंत भगवान बाबाची भव्य मूर्ती आणि तळघरात भगवान बाबांची मूर्ती अशा स्वरूपाची भव्य वास्तू येथे असुन या मेळाव्यासाठी लाखोंच्या संख्येने जनसमुदाय दरवर्षी उपस्थित असतो. या पार्श्वभूमीवर भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

---

# केम्ब्रिज इंटरनॅशनल स्कूलच्या राज्यपातळीवर स्तरावर एज्युकेशन अवॉर्ड ने गौरव

■ अंबाजोगाईः प्रतिनिधी

केम्ब्रिज इंटरनॅशनल स्कूल सातत्याने शिक्षण क्षेत्रात बहुआयामी व नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवत आहे. या शाळेने शिक्षण क्षेत्रात केलेल्या अभूतपूर्व प्रगतीची दखल घेऊन मुंबई येथील टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन, एज्युकेशन सप्लाय एक्स्पो आणि टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने देशातील अनेक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कौशल्य विकास इंडस्ट्रिज, शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्ती यांना एका छताखाली आणून शिक्षण क्षेत्रातील प्रवाहाबद्दलचे परिवर्तनशील ज्ञान पडताळून पाहिले. त्यात व्यवस्थापनासाठी केम्ब्रिज इंटरनॅशनल स्कूलचा ' स्टार एज्युकेशन अवॉर्ड ' देऊन गौरव करण्यात



आला. हे अवॉर्ड संस्थाध्यक्ष डॉ. आत्माराम गंगणे यांनी स्वीकारले. या कार्यक्रमात ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी प्रशासक ,पुस्तके व शैक्षणिक साहित्य पुरवठादार यांच्या सहयोगाने शिक्षण क्षेत्र विकसित करण्यासाठी या महाएक्सपोचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन मुंबई प्रदर्शन केंद्र, नेस्को, गोरेगाव मुंबई येथे करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिक्षण क्षेत्रातील भारतातील एक भव्य उपक्रम आहे. ज्ञान, तंत्रज्ञान, विज्ञान क्षेत्रातील बदलते प्रवाह यावर उलगडून दाखवण्यात आले आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास देशाबाहेरील, देशातील प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ, विश्वस्त, शिक्षक, प्राध्यापक ,संस्थाचालक, संचालक, वरिष्ठ व्यवस्थापन सदस्य आणि उद्योजक उपस्थित होते. या यशाचे श्रेय संस्था अध्यक्षांनी प्राचार्य श्रध्दा पाटील -गंगणे व सर्व शिक्षकांना दिले आहे..

---

# तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवात उद्योजक प्रेमनाथ फकिरे यांच्या हस्ते आरती संपन्न

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे यंदा पाचवे पुष्प असून, शनिवारी सातव्या माळेनिमित्त परळीतील तेली समाजभूषण तथा उद्योजक प्रेमनाथ माधव आप्पा फकिरे यांच्या हस्ते श्री शनी देवाची पूजा व आरती, तसेच देवीची आरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

यावेळी तेली समाज दांडिया उत्सव समितीच्या वतीने उद्योजक प्रेमनाथ फकिरे आणि रमेश आप्पा चांदिवाले यांचा पुष्पहार व शाल देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री शनी मंदिराचे व्यवस्थापक चंद्रकांत उदगीरकर यांची विशेष उपस्थिती होती. दांडिया महोत्सवात महिलांसाठी संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महिलांचा लक्षणीय प्रतिसाद मिळाला. तसेच दांडिया खेळण्यासाठी महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमास मल्लिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, छगन आप्पा क्षीरसागर, अशोक बेंडे, चंद्रशेखर फुटके, ओंकार सोनटक्के, अजय सोनटक्के, शिवशंकर जठार, विनोद आळणे, शिवराज सोनटक्के, सोमनाथ क्षीरसागर आणि महारुद्र विटेकर यांच्यासह तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष तथा युवानेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतीश फुटके, राहुल क्षीरसागर, सुनील क्षीरसागर, दीपक साखरे, ईश्वर राऊत, रवी अन्नपूर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, गजानन बेंडे, प्रदीप पिंपळे, महेंद्र अन्नपूर्णे, अमोल क्षीरसागर, योगेश व्यवहारे आणि प्रसाद जठार यांच्यासह तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



